# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 22 August 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – २२ ऑगस्ट २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान–महाराष्ट्रातल्या पाच शास्त्रज्ञांचा गौरव
- शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी नवीन उपाययोजना लागू करण्याचा शासन निर्णय जारी
- येत्या रविवारी होणारी महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा तुर्तास स्थगित
- बदलापूर प्रकरणी दिरंगाईबद्दल मुंबई उच्च न्यायालयाचे पोलिस प्रशासनावर ताशेरे

आणि

- जालना जिल्ह्यात आज दोन वेगवेगळ्या अपघातात तीन जणांचा मृत्यू

****

राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रख्यात बायोकेमिस्ट डॉ गोविंदराजन पद्मनाभन यांना पहिला विज्ञान रत्न पुरस्कार, १० जणांना विज्ञान श्री पुरस्कार, ११ जणांना युवा विज्ञान पुरस्कार, आणि अंतराळ विज्ञान क्षेत्रात काम करणाऱ्या चांद्रयान तीन च्या चमुला विज्ञान टीम पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुण्यातल्या इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स एज्युकेशन अँड रिसर्चचे प्राचार्य जयंत भालचंद्र उदगावकर यांना जीवशास्त्रासाठी, बंगळुरू इथल्या इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ सायन्स मधले उमेश वार्ष्णेय यांना जीवशास्त्रासाठी, तर मुंबई इथल्या भाभा अणुसंशोधन केंद्राचे डॉ. आवेश कुमार त्यागी यांना अणुऊर्जा क्षेत्रातल्या योगदानासाठी विज्ञान श्री पुरस्कार यावेळी प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्रातले महेश काकडे यांना गणित आणि संगणक विज्ञान क्षेत्रातल्या योगदानबद्दल युवा विज्ञान पुरस्कारानं गौरवण्यात आलं.
अकोल्यातील प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. प्रशांत मंगले यांना संशोधन क्षेत्रातल्या योगदानासाठी तर यवतमाळचे डॉ. यशवंत गोटे यांना कृषि विज्ञान क्षेत्रातल्या विशेष योगदानासाठी राष्ट्रीय विज्ञान पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

****

पहिला राष्ट्रीय अंतराळ दिवस उद्या २३ ऑगस्टला साजरा केला जाणार आहे. यानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं होणाऱ्या विशेष कार्यक्रमाचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते उद्‌घाटन होणार आहे. यासोबतचं देशभरात एक हजाराहून अधिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. अंतराळ राज्यमंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी ही माहिती दिली.

****

कोलकाता इथं महिला डॉक्टरवर लैंगिक अत्याचार आणि हत्या प्रकरणाची आज सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. केंद्रीय अन्वेषण विभाग – सीबीआयनं या प्रकरणी आतापर्यंत केलेल्या तपासाची माहिती न्यायालयासमोर सादर केली. या प्रकरणाची पुढची सुनावणी पाच सप्टेंबरला होणार आहे. दरम्यान, या घटनेच्या निषेधार्थ संपावर गेलेल्या डॉक्टरांना परत कामावर रुजू होण्याचं आवाहन न्यायालयानं केलं होतं, त्यानुसार दिल्लीतल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्थान – एम्स तसंच राम मनोहर लोहिया रुग्णालयातल्या निवासी डॉक्टरांनी आपला संप मागे घेतला आहे.

****

ठाणे जिल्ह्यात बदलापूर इथं दोन विद्यार्थिनींच्या लैंगिक अत्याचार प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई केल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाने पोलिस प्रशासनावर ताशेरे ओढले आहेत. आज न्यायालयात या प्रकरणी सुनावणी झाली. ही घटना घडल्याची माहिती मिळताच पोलिसांनी गुन्हा दाखल करायला हवा होता. मात्र जनक्षोभानंतरच पोलिसांनी कारवाई केली, असं निरीक्षण न्यायालयानं नोंदवलं. हा गुन्हा लपवल्याप्रकरणी संबंधित शाळेवर कारवाई करणार असल्याची माहिती राज्य सरकारतर्फे उच्च न्यायालयात देण्यात आली. राज्य सरकारला याबाबत सविस्तर प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे निर्देश न्यायालयानं दिले आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २७ ऑगस्टला होणार आहे.

****

दरम्यान, या प्रकरणी महाविकास आघाडीनं परवा २४ ऑगस्टला महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. या बंदमागे कोणतंही राजकारण नसून महिला भगिनी सुरक्षित राहाव्यात यासाठी या बंदचं आवाहन केलं आहे, असं माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत वार्ताहर परिषदेत बोलत होते.

दरम्यान, राज्यात कुठलीही दुर्घटना होवू नये म्हणून सरकारने काळजी घ्यायला हवी, मात्र सरकारच या विषयाच राजकारण करत असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे. ते आज नंदुरबार इथं बोलत होते. गेल्या दहा वर्षांत राज्यात २२ हजार मुली आणि लहान मुलांवर अत्याचाराची प्रकरणे घडल्याकडे पटोले यांनी लक्ष वेधलं.

****

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षा उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी काही नवीन उपाययोजना लागू करण्याबाबतचा शासन निर्णय शिक्षण विभागाने जारी केला आहे. शाळा आणि परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवणं, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या अनुषंगाने काळजी घेणं, मुलींसाठी तक्रार पेटी, सखी सावित्री समिती, राज्यस्तरीय विद्यार्थी सुरक्षा आढावा समिती, यासंदर्भातले निर्देश या निर्णयात देण्यात आले आहेत. शाळेमध्ये विद्यार्थ्यांसोबत अनुचित प्रकार घडल्याचं उघड झाल्यानंतर संबंधित शाळा व्यवस्थापनाने २४ तासाच्या आत संबंधित शिक्षणाधिकाऱ्यांना माहिती द्यावी, अन्यथा संबंधित व्यक्ती अथवा संस्थेवर कारवाई करण्यात येईल, असं या शासन निर्णयात म्हटलं आहे.

****

रायगड जिल्ह्यातल्या जवाहरलाल नेहरु पोर्टच्या माध्यमातून वाढवण बंदराच्या उभारणीचं काम कमीत कमी वेळेत पूर्ण करण्यात येणार आहे. बंदरे, जहाज वाहतूक आणि जलमार्ग केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आज जेएनपीएच्या प्रशासकीय इमारतीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. जेएनपीए हे हरित बंदर करण्यात येणार असून, या प्रकल्पाच्या माध्यमातून दहा लाख रोजगाराची निर्मिती होणार आहे.

****

येत्या रविवारी २५ ऑगस्टला होणारी, महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा, पुढे ढकलण्यात आली आहे. आज महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची बैठक झाली, त्यात हा निर्णय घेण्यात आला. या परीक्षेची पुढील तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. २५ ऑगस्टला या दिवशीच आयबीपीएस, क्लर्क भरती परिक्षा असल्यानं सदर पूर्व परिक्षा पुढे ढकलण्यात आली आहे

****

मुंबई महानगर आणि परिसर–एमएमआरला जागतिक आर्थिक केंद्र बनवण्यासाठी निती आयोगाने केलेल्या अभ्यासाचा अहवाल आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सुपूर्द करण्यात आला. पाच वर्षांत एमएमआरचा जीडीपी दुप्पट करण्याचे उद्दिष्ट असल्याचं मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा वचनपूर्ती मेळावा आणि लाभार्थी सन्मान सोहळा आज कोल्हापूर इथं पार पडला. यावेळी मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार धैर्यशील माने तसंच मंत्रिमंडळातले अन्य सदस्य उपस्थित होते.

****

धाराशिव जिल्ह्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजन योजनेअंतर्गत तीन हजार २१४ प्रशिक्षणार्थी आस्थापनांनर रुजू झाले आहेत. जिल्ह्यात शिकाऊ प्रशिक्षणार्थी उमेदवारासाठी शासकीय कार्यालयाच्या आस्थापनेवरील पाच हजार ५६४ आणि खाजगी आस्थापनेवरील ४५७ अशी एकूण सहा हजार २२ पदे उपलब्ध करून दिली आहे.

****

ब्राह्मण समाजासाठी परशुराम आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्यात यावं, या प्रमुख मागणीसाठी जालना इथल्या गांधीचमन चौकात आमरण उपोषणाला बसलेले दीपक रणनवरे यांची आज आठव्या दिवशी आपलं उपोषण स्थगित केलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल फोनवरून उपोषणकर्ते रणनवरे यांच्याशी संवाद साधला, त्यांच्या मागण्या पूर्ण करण्याचं लेखी आश्वासन आज जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलं, त्यानंतर रणनवरे यांनी उपोषण स्थगित केलं. समाजाच्या मुख्य मागणीवर चर्चा करण्यासाठी येत्या तीन सप्टेंबर रोजी मुंबईत मंत्रिमंडळाची बैठक आयोजित करण्यात येणार असल्याचं रणनवरे यांनी यावेळी

वार्ताहरांना सांगितलं. दरम्यान, रणनवरे यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

जालना जिल्ह्यात आज दोन वेगवेगळ्या अपघातात तीन जणांचा मृत्यू झाला. पांगरी शिवारात समृद्धी महामार्गावर आज पहाटे भरधाव पिकअप वाहन समोरच्या वाहनाला धडकून झालेल्या अपघातात पीकअप वाहन चालकाचा जागीच मृत्यू झाला.

भोकरदन-आन्वा रोडवरील वाडी शिवारात आज सकाळी झालेल्या अन्य एका अपघातात दोघांचा मृत्यू झाला. वाडी शिवारात गणपती मंदिराजवळ तिघेजण घराबाहेर बसलेले असतांना भोकरदनकडे जाणाऱ्या भरधाव कार चालकाचं वाहनावरील नियंत्रण सुटून, या तिघांना धडकली, या अपघातात दोघांचा मृत्यू झाला, तर एका जखमीला पुढील उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर इथं हलवण्यात आल्याचं पोलीस सूत्रांनी सांगितलं.

****

अनेक देशामध्ये 'मंकी पॉक्स' या विषाणूजन्य आजाराचा संसर्ग वाढत आहे. हे लक्षात घेऊन छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आरोग्य विभागाच्या वतीने प्रतिबंध सर्वेक्षण मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेदरम्यान या आजाराची लक्षणं आणि प्रतिबंध याबाबत जनजागृती करण्यात येत असल्याचं, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर अभय धानोरकर यांनी सांगितलं आहे.

****

महिला अत्याचारांविरोधात, बीड इथं आज विविध संघटनांच्या वतीनं तीव्र निदर्शनं करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर करण्यात आलेल्या या निदर्शनात, स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडिया एसएफआय, डेमोक्रॅटिक युथ फेडरेशन ऑफ इंडिया डीवायएफआय आणि समविचारी पक्ष संघटनांनी सहभाग घेतला होता.

****

नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पीक विमा भरपाई न मिळाल्यासंदर्भातील तक्रारींच्या अनुषंगाने आज माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांची भेट घेतली. राऊत यांनी येत्या ३ सप्टेंबरपर्यंत शेतकऱ्यांना तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे आपल्या तक्रारी नोंदवाव्यात, असं आवाहन केलं आहे.

✲✲✲✲